**(बारा) तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर या सार्वजनिक प्राधिकरणातील अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिका-यांचा तपशील :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यक्रम योजनेचे नाव | : | **मायनॉरिटी स्कॉलरशीप** | **इ.बी.सी. प्रतिपूर्ती** |
| २ | लाभधारकांसाठी पात्रतेच्या अटी | : | **अ)** अर्जदाराने व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण केलेली असावी.<br>**ब)** अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. | **अ)** अर्जदाराने व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण केलेली असावी.<br>**ब)** अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| ३ | लाभ मिळण्यासाठी असलेल्या पूर्ण अटी | : | **अ)** अर्जदाराचा प्रवेश सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी)/स्पर्धा परीक्षेद्वारे घेतलेला असणे आवश्यक आहे किंवा अर्जदाराला १२ वी/पदवी परीक्षेमध्ये कमीत कमी ५० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. (महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी ५० टक्क्यांची अट लागू नाही)<br>**ब)** अर्जदार दुस-या कोणत्याही शिष्यवृत्ती/भत्ता यांचा लाभार्थी नसावा.<br>**क)** अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. २.५ लाखापेक्षा जास्त नसावे.<br>**ड)** शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाकरीता विद्यार्थ्याने पुढच्या वर्गामध्ये प्रवेश घेणे आवश्यक आहे. | **अ)** अर्जदाराने केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश निश्चित केलेला असावा.<br>**ब)** अर्जदार दुस-या कोणत्याही शिष्यवृत्ती/भत्ता यांचा लाभार्थी नसावा.<br>**क)** अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. १ लाखापेक्षा जास्त नसावे.<br>**ड)** शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाकरीता विद्यार्थ्याने पुढच्या वर्गामध्ये प्रवेश घेणे आवश्यक आहे. |
| ४ | योजनेचा लाभ घेण्यासाठी असलेली कार्यपध्दती | : | **अ)** विद्यार्थ्याने ऑन लाईन पध्दतीने अर्ज करावा. संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रत काढून आवश्यक कागदपत्रांसह प्राचार्यांकडे सादर करावा.<br>**ब)** प्राचार्यांनी विद्यार्थ्याच्या अर्जाची छाननी व प्रमाणित करणे आवश्यक आहे. | **अ)** विद्यार्थ्यांनी संपूर्ण भरलेला व आवश्यक कागदपत्रे जोडलेला ई.बी.सी.चा अर्ज ते शिक्षण घेत असलेल्या संस्थेच्या प्राचार्यांकडे सादर करावा.<br>**ब)** संस्थेने सदरहू प्राप्त अर्जांचा प्रस्ताव योग्य ती छाननी करून विभागीय कार्यालयाकडे सादर करावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | पात्रता ठरविण्याचे निकष आणि आवश्यक कागदपत्रे | : | **अ)** अर्जासोबत विद्यार्थ्याने मागील कोणती परीक्षा उत्तीर्ण केली त्याची गुणपत्रिका जोडावी.<br>**ब)** तसेच रू. २.५ लाखाच्या आत असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.<br>**क)** राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्रा बाबत टेलिफोन, लाईट बिल किंवा राशनकार्ड जोडावे. | **अ)** अर्जासोबत विद्यार्थ्याने मागील कोणती परीक्षा उत्तीर्ण केली त्याची गुणपत्रिका जोडावी.<br>**ब)** तसेच रू. १ लाखाच्या आत असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.<br>**क)** केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश निश्चित केल्याबाबतची प्रत अर्जासोबत जोडावी.<br>**ड)** तसेच अपत्यासंबंधीचा दाखला जोडावा. |
| ६ | या योजनेतून मिळणा-या लाभांचा तपशील | : | मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, सिख, पारसी, जैन समाजातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाचे प्रत्यक्ष शिक्षण शुल्क. (जास्तीत जास्त रू. २५०००) | योग्य ते पात्रतेचे सर्व निकष पूर्ण करीत असलेल्या विद्यार्थ्याला शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के एवढी ई.बी.सी. मंजूर करण्यात येते. |
| ७ | अनुदान वाटपाची पध्दत | : | तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत शिष्यवृत्तीकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या नावे असलेल्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम जमा केली जाते. | संस्थांकडून प्राप्त प्रस्ताव संचालनालयास सादर करून संचालनालयामार्फत प्राप्त अनुदान सर्व संस्थांकडून प्राप्त ई.बी.सी.चे अर्ज योग्य त्या अटी व पध्दतीने छाननी करून विभागीय कार्यालयामार्फत आदेश तयार करून संस्थांना धनादेश वाटप करण्यात येतो. |
| ८ | अर्ज कोणी करावा/अर्ज करण्यासाठी कार्यालयात कोणाला भेटावे. | : | मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, सिख, पारसी, जैन समाजातील विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर अर्ज ऑन लाईन भरावा. संचालनालयाच्या विभागीय कार्यालयात नेमून दिलेल्या अल्पसंख्यांक कक्षामध्ये जाऊन विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा. | व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण करीत असलेल्या व केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्याने अर्ज करावा. संबंधित प्राचार्यांकडे संपर्क साधावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | अर्जासोबत भरावयाची फी (असल्यास) | : | -- | -- |
| १० | अन्य फी असल्यास | : | -- | -- |
| ११ | अर्जाचा नमूना | : | संबंधित संस्थेत उपलब्ध | संबंधित संस्थेत उपलब्ध |
| १२ | सोबत जोडावयाची परिशिष्टे | : | -- | -- |
| १३ | परिशिष्टाचा नमूना (असल्यास) | : | -- | -- |
| १४ | उपलब्ध रकमेचा तपशील | : | अभ्यासक्रमाचे प्रत्यक्ष शिक्षण शुल्क (जास्तीत जास्त रू. २५,०००) | विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के रक्कम मंजूर करण्यात येते. |
| १५ | लाभधारकांची यादी | : | -- | -- |
| १६ | उद्दिष्ट (ठरविले असल्यास) | : | -- | -- |
| १७ | शेरा (असल्यास) | : | -- | -- |